## १) विकास सोसायटी मार्फत कर्जपुरवठा :-

### १) विकास सोसायट्यामार्फत शेतकरी घर बांधणी कर्जे :-

जिल्ह्यातील प्राथमिक सेवा सहकारी सोसायटीचे शेतकरी सभासदांना ग्रामीण भागात घर बांधणी करणेसाठी कर्जपुरवठा केला जातो. या योजनेखाली शेतकरी सभासदांना खालील धोरणास अनुसरुन कर्ज मिळू शकेल.

१ **विकास सोसायटीची व सभासदाची पात्रता** - १) कर्ज मागणी सभासद हा विकास सोसायटीचा सभासद असला पाहिजे व तो मागील सलग ३ वर्षामध्ये थकबाकीदार नसावा. २) सोसायटीची बँक पातळीवर एकत्रित व त्याच कारणाची वसुली १०० % असली पाहिजे. ३) सभासदाकडून बँकेस तारण द्यावयाचे क्षेत्र निर्वेध असावे. ४) घर बांधकाम मालकी हक्काचा उतारा व सदर मालकी हक्कात एकापेक्षा जादा नांवे असल्यास सदर व्यक्तिंचे रु.१००/- चे स्टॅम्पवर नोटराईज्ड संमतीपत्र, बांधकाम/वाढीव बांधकामाचा ग्रामपंचायत/नगरपालिका बांधकाम परवाना, प्लॅन आणि एस्टीमेंटवरती नांव, मिळकत नंबर व तारीख नमूद असणे आवश्यक आहे, तसेच सदरचा प्लॅन मान्यताप्राप्त आर्किटेक्ट/इंजिनिअरने तयार केला असला पाहिजे व त्यावर त्यांची/सभासदांची सही तसेच ग्रामपंचायत/नगरपालिका यांची मान्यताप्राप्त सही/शिक्का आवश्यक आहे, घर बांधकामाच्या आराखड्यावर दारे व खिडक्याचा साईज/आकार इत्यादी माहिती बरोबरच बांधकामाचे क्षेत्रफळ इ., प्रत्यक्ष वापरात येणाऱ्या बांधकामाचे क्षेत्रफळ नमूद केलेले असावे, घर जागेचे टायटल क्लिअर (जागेच्या हक्काबाबत) असलेबाबतचा वकिलांचा सर्च रिपोर्ट देणे आवश्यक आहे.

२ **कर्जमर्यादा** - घर बांधकाम इस्टीमेंटच्या ७५ % इतपत व जास्तीत जास्त रु.१५.०० लाख मात्र कमाल कर्जमर्यादा राहील. मात्र सभासदाची दर एकरी परतफेड कुवत विचारात घेवून कर्ज मंजूर करणेत येईल.

३ **कर्जाची मुदत व परतफेड** - सदर कर्जाची परतफेडीची मुदत १० वर्षे राहील. कर्ज रक्कमेवर दर ६ महिन्यांनी (सप्टेंबर/मार्च अखेर) व्याज आकारणी करुन व्याज वसूल करणेत येईल. कर्ज उचलीपासून ११ महिन्यांनी येणाऱ्या तारखेस किंवा ३१ मार्च यापैकी प्रथम येणाऱ्या तारखेस व्याज वसुलीस पात्र राहील. त्यानंतर पुढील ९ वार्षिक समान हप्त्यात कर्जाची वसुली केली जाईल.कर्जाच्या मुद्दल परतफेडीसाठी कर्जाचा पहिला हप्ता कर्ज उचलले तारखेपासून २४ व्या महिन्यात येणाऱ्या तारखेस व्याजासह वसुलीस पात्र राहील.

४ **कर्जासाठी तारण** :- कर्जदार यांनी घर बांधकाम जागा व कर्जातून निर्माण होणारी इमारत तसेच शेत जमिन या सर्व मिळकती बँक व सोसायटीचे संयुक्त नांवे रजि.मॉर्गेज डीडने तारण देणेचे आहे, तारण द्यावयाच्या शेत जमिन मिळकतीचे मे.दुय्यम निबंधक यांचे मुल्यांकन देणे आवश्यक आहे.

५ **कर्जमर्यादा व व्याजदर** - सदर कर्जास व्याजाचा दर वि.का.स. सोसायटीस ११% व सभासदास १३% राहील (ज्या त्या वेळच्या धोरणानुसार व्याजदर राहील)

६ सभासदाची पिकवार परतफेड कुवत विचारांत घेऊन परतफेड कुवती इतपत किंवा एकरी कर्जमर्यादा इतपत यामध्ये जी कमी रक्कम असेल त्यास मंजूरी दिली जाईल.

७ बँक धोरणानुसार बँकेचे शेअर्स घेणेचे आहेत.

८ शेतकरी घर बांधणी कर्ज प्रकरण करणेस पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.